फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
सीआयएनः U45200MH1974SGC017206
कार्यालय :–महाव्यवस्थापक, नागपूर प्रदेश, नागपूर
एफडीसीएम भवन 359/B हिंगणारोड, अंबाझरी, नागपूर– 440 036
ई–मेल–rmngp328@gmail.com दुरध्वनी क्रमांक : (O) 0712-2811901 वेबसाईट : www.fdcm.nic.in

क्रमांक : एफडीसीएम/महाव्यनाप्र/आस्था/प्र.क्र.745/1297 नागपूर, दिनांक : 30/08/2023

## कार्यालयीन आदेश

विषय : वर्ग 4 मधून वर्ग 3 मध्ये लिपीक या पदावर पदोन्नती व पदस्थापना करणेबाबत

विषयांकित प्रकरणी खालील नमुद केलेल्या वर्ग 4 कर्मचारी यांचे वर्ग 4 मधून वर्ग 3 लिपीक संवर्गात वेतन बॅंड एस–6 (रू. 19900– रू. 63200) मधील वेतन रू. 19900/– या वेतनश्रेणीत (सातवे वेतन आयोगाप्रमाणे) पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विभागात/प्रदेशात पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदोन्नती देण्यात आलेल्या वर्ग 4 कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग | सध्या कार्यरत प्रदेश/विभाग | पदोन्नती नंतर पदस्थापना करण्यात आलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. एस.एस.इरपाते, चौकीदार | अ.ज. | खुला | वप्रवि, नागपूर | महाव्य. कार्यालय नागपूर |
| 2 | श्री डी.के.सर्याम, नाईक | अ.ज. | खुला | व्यवस्थापकीय संचालक, कार्यालय नागपूर | वन प्रकल्प विभाग, भंडारा |
| 3 | श्री. एम.पी.इंगोले, चौकीदार | खुला | खुला | व्यवस्थापकीय संचालक, कार्यालय नागपूर | वन प्रकल्प विभाग, नागपूर |

2.00 उपरोक्त वर्ग 4 कर्मचारी यांना वर्ग 3 लिपीक संवर्गात पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017 च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खुल्या प्रवर्गात ज्येष्ठतेने देण्यात येत आहे.

3.00 त्यांना कळविण्यात येते की, पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्यापुर्वी लिपीक संवर्गाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, टायपिंगचे प्रमाणपत्र व संगणक अर्हतेचे प्रमाणपत्रांची छायांकित प्रत आपले संबंधित कार्यालयास सादर करावे.

4.00 पदोन्नतीनंतर लिपीक पदावर रूजू झाल्यानंतर एफडीसीएम लिमी. चे लिपीक पदाकरिताचे सर्व नियम लागु राहतील.

5.00 पदोन्नतीनंतर विभागीय परिक्षा उत्तीर्ण करणे आपणास अनिवार्य राहील.

6.00 पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्यापुर्वी मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र कार्यालयात सादर करावे.

7.00 सदरहू आदेश हे तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहेत. करिता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी स्थानिक व्यवस्था करून उपरोक्त कर्मचारी यांना पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणेकरिता कार्यमुक्त करावे, ही विनंती.

30/8/23
(चंद्रसेकरन बाला एम)
महाव्यवस्थापक
नागपूर प्रदेश, नागपूर

प्रति,
उपरोक्तप्रमाणे सर्व,
प्रतिलीपी : व्यवस्थापकीय संचालक, कार्यालय यांना माहितीकरिता सविनय सादर.

प्रतिलीपी : महाव्यवस्थापक (मुख्यालय), नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता सादर. त्यांनी श्री डी.के.सर्याम, नाईक व श्री. एम.पी.इंगोले, चौकीदार यांना कार्यमुक्त/रूजू करणेबाबत आदेश आपले स्तरावरून निर्गमित करावे, ही विनंती.

प्रतिलीपी : विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, नागपूर/भंडारा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

प्रतिलीपी : www. fdcm.nic.in